## विशेष दिवाणी दावा क्र.५८/२०२५ मधील निशाणी क्र.२६ वरील आदेश

(अजय निकम वि. प्रकाश निकम वगैरे)

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दिलेला आहे.

०२. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादीविरुध्द दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप वादींचे हिश्श्याचा अलग व पृथक कब्जा मिळणेबाबत व निरंतर ताकिदीबाबत वगैरेकरिता दाखल केलेला आहे. वादीने दावा तयार करतेवेळी म्हणजेच फेब्रुवारी २०२५ मध्ये दावा कलम १ब म्हणजेच कसबे विटा येथील रि.स.नं.२९०/१/२/ब या मिळकतीचे मुल्यांकन सन २०२४-२५ मधील मुल्यदर तक्त्यानुसार रु.१,९२०/- प्रति चौ.मी. या दराप्रमाणे नमूद केलेले होते. असे असता वादीने सदरचा दावा दि.२/८/२०२५ रोजी दाखल केला असून दि.३१ मार्च, २०२५ नंतर मुल्यदरामध्ये वाढ झालेने कसबे विटा येथील रि.स.नं.२९०/१/२/ब या मिळकतीचे मुल्यांकन सन २०२५-२६ मधील मुल्यदर तक्त्यानुसार रु.२,१२०/- प्रति चौ.मी. अशी झालेली आहे. असे असता सदरकामी प्रतिवादी नं.८ यांनी निशाणी क्र.१७ ला अर्ज देवून दाव्यास आवश्यक कोर्ट फी दिला नसलेने दाव्यास सी.पी.सी. ऑर्डर ७ रुल ११ ची बाधा येत असलेबाबत हरकत, तक्रार उपस्थित केलेली आहे. असे असता सदर अर्जाची दुतर्फा चौकशी होवून कोर्टाने वादी यांना कमी पडणारा कोर्ट फी स्टॅम्प भरणेबाबत दि.९/१२/२०२५ रोजी आदेश पारित केलेला आहे.

०३. वादीचे पुढे असे कथन आहे की, वादीने दावा तयार करतेवेळी म्हणजेच फेब्रुवारी, २०२५ मध्ये दावा कलम १ब म्हणजेच कसबे विटा येथील रि.स.नं.२९०/१/२/ब या मिळकतीचे मुल्यांकन सन २०२४-२५ मधील मुल्यदर तक्त्यानुसार रु.१,९२०/- प्रति चौ.मी. या दराप्रमाणे होते. असे असता वादीने सदरचा दावा दि.२/८/२०२५ रोजी दाखल केला असून दि.३१ मार्च,

२०२५ नंतर मुल्यदरामध्ये वाढ झालेने कसबे विटा येथील रि.स.नं.२९०/१/२/ब या मिळकतीचे मुल्यांकन सन २०२५-२६ मधील मुल्यदर तक्त्यानुसार रु.२,१२०/- प्रति चौ.मी. येत असलेने रु.२,१२०/- प्रति चौ.मी. दराने होणार असून योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प वादी में कोर्ट मजकूरी भरणेस तयार आहेत. सदरकामी यापूर्वी दाव्यासोबत रु.४,७९०/- चा कोर्ट फी स्टॅम्प दिला असून वादी हे जादा र.रु.४४०/- चा कोर्ट फी स्टॅम्प देणेस तयार आहेत. सबब, सदर दाव्याचेकामी खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेत यावी.

१. दावा दाव्याचे हेडींगमध्ये वि.किं. रु.१०,२४,७४९/- यातील रु.१०,२४,७४९/' या आकड्यास काट देणेत येवून त्याठिकाणी 'रु.११,३१,३४९/-' असा दुरुस्त अंक लिहिणेस परवानगी असावी.

२. तसेच दावा कलम ८ दाव्याची आकारणी या कॉलममध्ये वरुन सहाव्या ओळीतील रु.१०,२३,३६०/- व १०,२४,७४९ रु. ६० पैसे या दोन्ही आकड्यास काट देणेत येवून त्याठिकाणी "रु.११,२९,९६०/-" व "११,३१,३४९ रु. ६० " असे नवीन अंक लिहिणेस परवानगी असावी.

३. तसेच सदर कलमातील शेवटून दुसरे ओळीतील १०,२५,७४९ रु. ६० पैसे या आकड्यास काट देणेत येवून त्याठिकाणी "११,३२,३४९ रु. ६० " असा नवीन अंक लिहिणेस परवानगी असावी.

०४. वादीने मागणी केलेली दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची असून मे. कोर्टानी निशाणी क्र.१७ वरील आदेशाप्रमाणे करणे भाग पडत आहे. अशा दुरुस्तीमुळे दाव्याचे मूळ स्वरुपात व दाव्याचे कारणात कोणताही मुलभूत बदल होत नाही अगर सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होत नाही. अशी दुरुस्ती न झालेस वादीला वादीला रास्त मालकी हक्काचे मिळकतीस मुकावे लागून वादीचे पैशाने न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर होणेची त्यांनी विनंती केली.

**<u>प्रतिवादी क्र.८ तर्फे निशाणी क्र.२६ चे अर्जास म्हणणे खालीलप्रमाणे</u>–**

०५. प्रतिवादी यांना वादी यांचे निशाणी क्र.२६ कडील अर्जातील मजकूर मान्य नाही व कबूल नाही. सदरचा अर्ज मंजूर झालेस दाव्यातील मूळ स्ट्रक्चरमध्ये बदल होणार आहे व त्यामुळे प्रतिवादी क्र.८ यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली. तसेच अर्ज मंजूर करणेचे झालेस वादी यांना जास्तीत जास्त कॉस्ट करणेची विनंती केली.

०६. उभय पक्षकारांतर्फे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी नं.८ यांनी निशाणी क्र.१७ ला अर्ज देवून दाव्यास आवश्यक कोर्ट फी दिली नसलेने दाव्यास सी.पी.सी. ऑर्डर ७ रुल ११ ची बाधा येत असलेबाबत हरकत, तक्रार उपस्थित केलेली होती व सदर अर्जाची दुतर्फा चौकशी होवून कोर्टाने वादी यांना कमी पडणारा कोर्ट फी स्टॅम्प भरणेबाबत दि.९/१२/२०२५ रोजी आदेश पारित केला होता. त्यानुषंगाने वादी यांनी दाव्यामध्ये मागितलेली दुरुस्ती पाहता सदरची दुरुस्ती ही आवश्यक असलेचे दिसून येत आहे व सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही.

०७. याठिकाणी वादी हे या न्यायालयाने दि.०९.१२.२०२५ रोजी निशाणी क्र.१७ वर जो आदेश पारित केलेला आहे त्या आदेशाचे पूर्ततेसाठी प्रस्तुतचा अर्ज सादर केला आहे असे दिसून येत आहे. त्यामुळे वादीने मागितलेली दुरुस्ती मंजूर केलेस या स्थितीला प्रतिवादीची कोणतीही हानी होईल असे दिसून येत नाही. याउलट प्रस्तुत दुरुस्तीद्वारे वादीचा दावा सुस्पष्ट होत आहे, तसेच तो गुणावगुणावर चालणेस मदत होणार आहे. या कारणाने मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे;

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | वादी यांचा दुरुस्ती अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| २. | वादी यांनी उपरोक्त आदेशास अनुसरुन अभिलेखावर दाव्याची दुरुस्त प्रत पुढील तारखेपर्यंत दाखल करावी. |

AVINASH RAMAKANT MALVADE
Digitally signed by AVINASH RAMAKANT MALVADE
Date: 2026.02.03 17:38:09 +0530

विटा. (अ. र. माळवदे)
दिनांक ०३.०२.२०२६. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, विटा,
ता.खानापूर, जि.सांगली.

*****

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F file are same, word to word, as per the dictation.

| | |
|---|---|
| Name of Stenographer: | S.V. Gaikwad, (Grade-II) |
| Name of the Court - | Civil Judge, Senior Division, Vita |
| Date of pronouncement - | 03.02.2026 |
| Order signed by the Presiding Officer on - | 03.02.2026 |
| Order uploaded on - | 03.02.2026 |